Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 607 – 612
DOI: 10.5281/zenodo.10258962

Original Research Article

# महात्मा गांधीजींची रामराज्य संकल्पना

प्रा. डॉ. मुक्ता गंगथडे

श्रीमती सुशीलादेवी देशमुख महिला महाविद्यालय, लातूर ४१३५३१ महाराष्ट्र, भारत

Received: 13 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 28 October, 2023

## प्रस्तावना

'भगवदगितेला' मार्गदर्शक मानणारे महात्मा गांधीजी अतिशय धार्मिक व संस्कारक्षम वातावरणात वाढले. गीतेचा गांधीजींवर फार मोठा प्रभाव होता. 'परस्त्रीला मातेसमान वागणूक' 'फळाची अपेक्षा न ठरता काम करत रहा,' या वचनाने ते अत्यंत प्रभावित झाले. गांधींना माणसांमधील नैतीकता हवी होती. धार्मिक, नैतीक आणि संयमीत जीवन जगत असताना गांधीजीनी आपल्याला अनेक गोष्टींची शिकवन दिली. गांधींचा धर्मविचार हा व्यवहारिक, वास्तववादी होता. म्हणजे धर्मातून समाजाचे दैनंदिन प्रश्न सुटायला हवेत असे त्यांचे मत होते. धर्माचे कोणतेही तत्व विवेकाच्या विरोधात जाणारे असेल किंवा नैतिकतेशी संघर्ष करणारे असेल तर या तत्वाला गांधीजींचा नकार होता. गांधीजी सर्वधर्मसमभाव मानणारे होते. त्यांची सार्वत्रीक धर्मावर, वैश्वीक धर्मावर श्रध्दा होती. सर्व धर्मांच्या श्रध्दा, शिकवण यांचा गांधी आदर करीत असत.

समाजातील अस्पृश्यता मूळासकट उखडून टाकली पाहिजे असे गांधीजींचे मत होते. त्यांना जातींच्या आधारावर भेदभाव मान्य नव्हता. वेगवेगळ्या जातींचे लोक एकत्र आले की आदर्श समाज प्रस्थापीत होईल असे त्यांना वाटत होते. सर्वोदय म्हणजे सर्व समाज घटकांचा विकास हे त्यांचे ध्येय होते. गांधीजींनी स्त्री-पुरुष समानतेला मान्यता दिली. त्यांचे असे मत होते की, स्त्री-पुरुषांमधील नैसर्गिक भेद हा श्रेष्ठ -कनिष्ठता दर्शवित नाही तर कर्तव्यांमधील वेगळेपण व्यक्त करतात. त्यांचा स्त्रियांना असा सल्ला होता की त्यांनी गुलामगिरी वृत्ती सोडून देऊन पुरुषांच्या बरोबरीने काम केले पाहिजे आणि मानवी विकासाला हातभार लावला पाहिजे. अहिंसा प्रस्थापीत करण्यात स्त्रियाच मोठ्या प्रमाणात योगदान देऊ शकतात असे त्यांचे मत होते.

गांधीजींचे सत्य व अहिंसा, सत्याग्रह, सर्वोदय संकल्पना, ग्रामस्वराज्य, विश्वस्त सकंल्पना स्वराज्य, स्वातंत्र्य, लोकशाही गांधीची रामराज्याची कल्पना धार्मीक व सामाजिक विचार, स्त्री-पुरुष समानता, अस्पृश्यता निवारण, खादी आणि स्वदेशी संबंधी विचार, नैतीक आचरणासंबंधी विचार, धर्म आणि भगवद्गितेविषयी असलेली त्यांची श्रध्दा या आणि अशा अनेक महत्वाच्या पैलूंवर महात्मा गांधीजींनी आपले मौलीक विचार मांडलेले आहेत. आपले संपूर्ण जिवन समाजासाठी, राष्ट्रासाठी अर्पण करणारे महात्मा गांधी खऱ्या अर्थाने महात्मा आहेत. प्रत्येक व्यक्तीचे समाजातील अस्तित्व कसे असावे यापासून ते एक आदर्श राज्य म्हणजेच रामराज्याची संकल्पना त्यांनी मांडली आणि याच माध्यमातून त्यांनी त्यांचे एक आदर्श जिवनच आपल्यासमोर ठेवले आहे.

**गांधीजींची रामराज्याची कल्पना**

महात्मा गांधी हे अराज्यवादी आदर्शवादी विचारवंत होते. गांधीजींना राज्यविरहीत, वर्गविरहीत आणि समताधिष्टीत समाज अपेक्षीत होता. गांधीजींच्या मते मनुष्य मुळातच सद्विवेकी, सद्गुणी आहे. तो आपल्या सद्सद्विवेकबुध्दीच्या आधारे निर्णय घेऊ शकते व्यक्तीला स्वत:चे हित कशात आहे हे चांगल्या प्रकारे कळू शकते.

महात्मा गांधीजींच्या मते राज्यांनी किमान कार्य करावीत. सत्तेचे विकेंद्रीकरण केले जावे, ग्रामीण स्वायत्तता प्रस्थापीत व्हावी, सत्य आणि अंहिंसा हे राज्यांचे घटक असावे अशा आदर्श राज्यांच्या मांडणीत गांधीजींनी रामराज्याचे विचार व्यक्त केले आहेत.

रामायणातील राज्यात राम राजा होता, म्हणजे राजेशाही होती मात्र गांधीजी लोकशाहीवादी होते. शिवाय गांधीजींच्या दृष्टीने राज्याचे बाह्य स्वरुप राजेशाही वा लोकशाही हे महत्वाचे नसून राज्य न्यायावर आधारीत आहे किंवा नाही याला महत्व आहे. रामराज्य हे धर्माचे व न्यायाचे राज्य होते. रामराज्याकडे ते दोन दृष्टीने पाहतात. प्रत्येक माणसात चांगली व वाईट अशा दोन्ही प्रवृत्ती असतात.

म्हणजे रामाची व रावणाची वृत्ती होय. रामाची वृत्ती म्हणजे धर्माची, न्यायाची वृत्ती होय. रामराज्य प्रस्थापीत होणे म्हणजे गांधींच्या मते स्वार्थांचा अंत होऊन धर्म, न्याय यांची प्रस्थापना होणे किंवा स्वार्थी जनतेचे रुपांतर न्याय, सत्य यात होणे होय. गांधीजींची रामराज्याची व्यवस्था आदर्श स्वरुपाची असून या राज्यात वर्ग, जात, धर्म ई. गोष्टींचे निर्मूलन करण्यात येईल्. एक स्वयंपूर्ण, स्वयंशासीत आदर्श समाज अस्तीत्वात येईल. या आदर्श राज्यात खेडे हा त्यांच्या विचारांचा मुख्य आधार आहे. त्यात त्यांनी आदर्श राज्यांच्या रचनेचा, तिच्या कार्याचा विचार केलेला आहे.

**1. आदर्श समाज**

गांधीजींना अपेक्षित आदर्श समाजात राजकीय सत्तेची आवश्यकता असणार नाही. त्यांच्या कल्पनेतला हा समाज अहिंसक समाज असेल. गांधीजींच्या मते अहिंसक समाजाची निर्मिती होईपर्यंत त्यांना राज्याची आवश्यकता भासेल पण समाजातील अहिंसेची वृत्ती जसजशी वाढत जाईल तशी राज्याची आवश्कता राहणार नाही. हा समाज स्वयंशाशीत

असेल. गांधीजींच्या मते असे हे आदर्श राज्य ग्रामराज्यांचे संघराज्य असेल. या समाजाची स्वयंपूर्णता आणि विकेंद्रीत कारभार ही प्रमुख वैशिष्ट्ये असतील अशा या अहिंसक समाजात कोणत्याही प्रकारच्या केंद्रीकरणाला थारा राहणार नाही. हा समाज पूर्णपणे दोषविरहीत असा समाज असेल. असा आदर्श समाज गांधीजींना अपेक्षीत आहे.

**2. आदर्श राज्याचा आधार – खेडे**

महात्मा गांधीजींच्या आदर्श राज्यांचा केंद्रबिंदू खेडे आहे. त्यांचे स्वरुप हे प्राचीन ग्रामराज्यांसारखे असेल. तसेच या आदर्श राज्याची स्थिती ग्रिक नगरराज्यासारखी असेल. त्यात प्रत्येक खेड्याला महत्वाचे स्थान असेल. कारण गांधीजींच्या मते खरा भारत हा शहरात नसून खेड्यात आहे.

**समाजसेवा**

गांधीजींच्या रामराज्याचा प्रमुख उद्देश म्हणजे समाजाची सेवा करणे हा आहे. सामाजिक, आर्थिक, धार्मिक या घटकांवर राजराज्यांची उभारणी त्यांना अपेक्षीत होती. तसेच सर्वांच्या उत्पनाचे साधन म्हणून हे राज्य कार्य करेल. थोडक्यात आदर्श राज्याचा उद्देश हा समाजाची सेवा करण्याचा असेल.

**प्रजेला महत्वाचे स्थान**

गांधीजींच्या मते स्वराज्य आणि रामराज्य हे एकच असेल. स्वराज्यात धर्मराज्य असले पाहिजे. यात त्यांनी प्रजेला महत्वाचे स्थान दिले आहे. लोकहिताला जपणारी जी माणसे असतील त्यांचे मत म्हणजेच लोकमत असेल. अशा मतांवर आधारलेले राज्य खरे लोकराज्य होईल् अशी त्यांची धारणा होती.

**3. आदर्श राज्याची रचना**

महात्मा गांधींनी आदर्श राज्य किंवा रामराज्य कसे असावे याची रचना स्पष्ट केलेली आहे.

**स्वयंपूर्ण खेडे**

महात्मा गांधीजींच्या मते आदर्श राज्यातील प्रत्येक खेडे हे स्वयंपूर्ण आणि स्वयंशासीत असेल. तसेच खेडयांना दिले जाणारे स्वातंत्र्य हेच खरे स्वातंत्र्य असेल. त्यांना पूर्णत: अधिकार असतील, तसेच त्यांची राष्ट्रीय सत्ता ही विकेंद्रीत असेल आणि सहकार आणि ग्रामपंचायतीच्या सहाय्याने राज्यकारभार चालविण्यात येईल.

**श्रमाला प्रतिष्ठा**

गांधीजींनी कोणत्याही श्रमाला महत्व दिलेले आहे. त्यांच्या मते जर आपण व्यवसायिक समानतेचा स्विकार केला तर समाजात समानता निर्माण हाईल, समाजातील वर्णव्यवस्था नष्ट होईल आणि अशा समाजात कोणाचीही पिळवणूक होणार नाही. ज्या समाजात समानता प्रस्थापित झालेली असते अशा समाजातील लोकांच्या गरजाही कमीत कमी

असतात आणि तिथे कोणाचे शोषणही होत नाही. त्यामुळे अशा समाजात लोकांना शांततेचे आणि प्रतिष्ठेचे जीवन जगण्याची संधी प्राप्त होईल.

**योग्य उमेद्वाराची निवड**

गांधीजींच्या मते आदर्श राज्यात निवडणूकीच्या माध्यमातून नि:स्वार्थी आणि योग्यअशा उमेदवारांची निवड केली जाईल. एखादा व्यक्ती ज्यावेळी निवडणूकीसाठी मते मिळवतो तेंव्हा त्याने बोगस आश्वासने व खोटी वचने न देता त्या व्यक्तीने समाजासाठी केलेल्या कार्याचा आणि सेवेचा हवाला देऊनच लोकांची मते मिळवावीत. बहुसंख्यांकानी अल्पसंख्यांकाचे रक्षण करावे. त्यांच्या मते एकूणच व्यक्तीच्या जिवनात राज्याचे कमीत कमी नियंत्रण असावे. अशा प्रकारे आदर्श राज्याची रचना गांधीजींना अभिप्रेत होती.

**आदर्श राज्याची कार्ये**

गांधीजींनी आदर्श राज्याची कांही प्रमुख कार्ये सांगीतली आहेत.

**सरळ, सुलभ न्यायव्यवस्था**

गांधीजींच्या मते आदर्श राज्यातील न्यायव्यवस्था ही साधी, सरळ, सोपी आणि कमीत कमी खर्चाची व विलंब न करणारी असेल. प्रत्येक खेड्यामध्ये आणि जिल्ह्यामध्ये शक्यतो पंचकमिटीच्या सहाय्याने निवाडे होतील. विशेष परिस्थितीतच त्यांना प्रांतीक न्यायालयात अपील करण्याठी परवानगी द्यावी. तसेच गांधीजींच्या मते न्यायालयातील वकिलांची फी कायद्याने निश्चित करावी.

**तुरुंगाचे रुपांतर सुधारगृहात व्हावे**

ज्यावेळी गुन्हेगार एखादा गुन्हा करतो तेंव्हा त्याला त्याच्या गुन्ह्यानूसार शिक्षा तर झालीच पाहिजे. परंतु जेंव्हा गुन्हेगाराला तुरुंगात आणले जात तेंव्हा त्या गुन्हेगारात सुधारणा कशा करता येतील याकडे आपला कल असला पाहिजे. म्हणजेच तुरूंगव्यवस्थेकडे त्याचा पाहण्याचा दृष्टीकोन हा सुधारणावादी स्वरुपाचा होता. गांधीजींच्या मते गुन्हेगारांना गुन्हेगारीपासून कसे परावृत्त करता येईल याचा प्रयत्न करावा. त्यांच्या समस्या ह्या अहिंसात्मक मार्गाने हाताळाव्यात. एकंदरीतच तुरुंग म्हणजे सुधारगृह बनावे. यामुळे गुन्हेगारांना आपल्या कृत्याचा पश्चाताप होईल आणि भविष्यात गुन्हे करण्यास तो प्रवृत्त होणार नाही अशी हृद्यपरिवर्तनाची वागणूक गुन्हेगारांना द्यावी असे गांधीजींचे मत होते. त्यांच्या मते कैद्यांना तुरुंगातच उद्योगधंद्याचे शिक्षण द्यावे. त्यांनी उत्पादित केलेल्या वस्तू विकून तुरुंगाचा खर्च भागवावा. तुरुंगाचे स्वरुप हे मानसोपचार केंद्रासारखे असावे.

**शिक्षण व्यवस्था**

इंग्रजानी चालू केलेल्या शिक्षणपध्दतीतून देशाचे कल्याण होणार नाही तर एक स्वयंपूर्ण, स्वयंशासीत आदर्श समाजव्यवस्था स्तीत्वात येण्यासाठी उपयुक्त अशा शिक्षण प्रणालीचाही गांधीजींनी विचार केला होता. हि शिक्षणप्रणाली अंमलात आणणे आवश्यक आहे तरच देशाची प्रगती होईल असे त्यांचे मत होते.

**स्वावलंबी शिक्षण व्यवस्था**

महात्मा गांधीचे शैक्षणिक विचार हे 'नयी तालीम' या नावाने प्रसिध्द आहे. त्यांच्या मते जीवनात यशस्वी होण्यासाठी व्यवाहारिक शिक्षणावर भर दिला पाहिजे. तरुणांनी शिक्षण घेतल्यानंतर त्यांना स्वत:चा व्यवसाय करता आला पाहिजे. ग्रामीण जीवनात आणि अर्थव्यवस्थेत बदल घडवून आणण्यासाठी शिक्षणाचा उपयोग झाला पाहिजे. हस्तव्यवसाय, लघूउद्योग, कुटीरउद्योग त्यांना करता आले पाहिजेत. त्यामुळे सुशिक्षीत बेकारीचा प्रश्न निर्माण होणार नाही. शिक्षण हे व्यक्तीला स्वावलंबी बनवणारे असले पाहिजे असे त्यांचे मत होते.

**चारित्र्य आणि राष्ट्रवादी भावना**

गांधीजींच्या मते केवळ पाठांतराने आणि पुस्तकी ज्ञानाने माणसाची सर्वांगिण उन्नती होऊ शकत नाही. शिक्षणाचा उददेश हा ज्ञानाबरोबरच व्यक्तीमत्व आणि चारित्र्याचा विकास घडवून आणण्याचा असला पाहिजे. त्याचबरोबर त्या शिक्षणातून राष्ट्रप्रेमाची भावना जागृत होणे आवश्यक आहे. आपल्या देशाप्रती व देशाबांधवाप्रती आदर, आपुलकी, प्रेमभावना, त्याग, बंधूता, सहिष्णूता निर्माण होणे हा खरा शिक्षणाचा उद्देश असला पाहिजे.

**प्राथमिक शिक्षणावर भर**

महात्मा गांधीजींचा प्राथमिक शिक्षण देण्यावर विशेष भर होता. शिक्षणाचा प्रमुख उद्देश व्यक्तीचा सर्वांगिंण विकास करणे हा आहे. प्राथमिक शिक्षण विनामुल्य व सक्तीचे असावे तसेच ते वयाच्या 7 वर्षापासून ते 14 व्या वर्षांपर्यंत देण्यात यावे.

**प्राधान्याने मातृभाषेतून शिक्षण**

गांधीजींच्या मते शिक्षण हे मातृभाषेतून दिले जावे. मातृभाषेतून शिक्षण दिल्यास विषय चांगला समजतो तसेच मुलांमध्ये मातृभाषेबद्दल प्रेम आणि आदराची भावना जोपासली जाते. उत्तम समजाची निर्मिती होते.

**श्रमाची आवड**

भारतामध्ये इंग्रजाच्या शिक्षण पध्दतीमुळे आरामदायी शिक्षण वर्गाची निर्मिती झाली होती. तसेच या वर्गात शारीरिक श्रमाबद्दल तिटकारा निर्माण झाला होता. त्यामुळे गांधीजीचे असे मत होते कि, शिक्षणामध्ये शारीरिक श्रमाला प्राधान्य देण्यात यावे विद्यार्थ्यांमध्ये श्रम-प्रतिष्ठा वाढविणे हेच शिक्षणाचे ध्येय आहे. चार भिंतीच्या आड कोंडून फक्त

पुस्तकी शिक्षण देण्यापेक्षा – उद्योग- शिक्षण, कृती प्रधान शिक्षणावर भर देण्यात यावा. असे शिक्षण जे विद्यार्थ्यांना कार्यक्षम व स्वावलंबी बनवेल. आर्थिक, शैक्षणिक, व शारीरिक कार्यक्षमता वाढविणारे शिक्षण महात्मा गांधीजीना योग्य आणि अपेक्षीत होते.

शिक्षणात खरेपणा आणि अहिंसेला प्राधान्य दिले जावे तसेच शिक्षण हे सामाजिक आणि आर्थिक प्रगतीचे उत्तम साधन आहे. आपले भविष्य उज्वल करणारे, तसेच नितीमुल्यांनी समृद्ध स्वावलंबी आणि राष्ट्रवादी विचारांची शिकवण देणारे शिक्षण हि खरी राष्ट्राची गरज आहे.

थोडक्यात रामराज्य म्हणजे गांधीजींनी जनते समोर ठेवलेले आदर्श समाजाचे प्रारुप होय. सामूहिक प्रयत्नाने असा समाज स्थापने हे त्यांचे उदिृष्ट असावे. राजकीय स्वातंत्र्य ही रामराज्याकडे जाण्याची पायरी आहे.

गांधीजीनी मांडलेल्या अमुल्य विचारांची आजच्या काळात अतिशय गरज आहे. हे आपल्याला सध्याच्या जागतिक स्थितीवरुन लक्षात येते. वेगवेगळया देशांमध्ये होत असलेले युध्द आणि यामध्ये झालेली हिंसा, न्याय, अत्याचार याकडे जर लक्ष वेधले तर एवढेच सांगावे वाटते की गांधीजींचे सत्य, अहिंसेचे तत्व, रामराज्यांची संकल्पना, धार्मिक व सामाजिक विचार, त्यांची सत्याग्रहाची संकल्पना हे फक्त वाचण्यापूरते किंवा सांगण्यापुरते मार्यादित न ठेवता आज संपूर्ण जगाने प्रत्यक्ष अंमलात आणण्याची वेळ आली आहे.

**संदर्भ सूची**

१. आधूनिक भारत - डॉ. सोमनाथ रोडे

२. आधूनिक भारतीय राजकिय विचारवंत - डॉ. रमेश ढोबळे

३. पाश्चिमात्य आणि भारतीय राजकिय विचारवंत - डॉ. प्रभा वाडकर

४. भारतीय राजकीय विचारवंत - डॉ. व्हि. जी. कुलकर्णी